आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ ऑक्टोबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- एनपीएस आणि युपीएस अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांनाही खासगी प्रमाणे शेअर बाजारात अधिक गुंतवणुकीचा मार्ग खुला

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिल्ली दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत चर्चा

- पाकव्याप्त काश्मीरमध्ये मानवी हक्कांचं उल्लंघन थांबवण्याचा भारताचा संयुक्त राष्ट्रांमध्ये पुनरुच्चार

- ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारताला विजयासाठी २३७ धावांची गरज

आणि

- आगामी २-३ दिवस राज्याच्या अनेक भागात पावसाचा इशारा, मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचं आवाहन

**<><><><>**

एनपीएस अर्थात राष्ट्रीय पेन्शन योजना आणि युपीएस अर्थात युनिफाइड पेन्शन योजनेतल्या सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनाही आता LC 75 अर्थात Life Cycle 75 आणि BLC अर्थात Balanced Life Cycle या पर्यायांचा अवलंब करता येणार आहे. आतापर्यंत केवळ खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना या सुविधा उपलब्ध होत्या. LC 75 मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना ७५ टक्क्यांपर्यंतची गुंतवणूक शेअर बाजारात करता येईल. ३५ ते ५५ या वयोगटात शेअर बाजारातल्या गुंतवणुकीचं प्रमाण कमी होऊन सरकारी आणि खासगी रोख्यातल्या गुंतवणुकीचं प्रमाण वाढेल. BLC मध्ये ४५ वर्षापर्यंत किमान ५० टक्के रक्कम शेअर बाजारात गुंतवता येईल. त्यानंतर तिचं प्रमाण कमी होईल आणि रोख्यांमधली गुंतवणूक वाढेल. हे नवे पर्याय खुले झाल्यानं सरकारी कर्मचाऱ्यांना युपीएस आणि एनपीएसमधल्या गुंतवणुकीसाठी अधिकाधिक मार्ग उपलब्ध होतील, शेअर बाजारातली गुंतवणूक वाढवण्याचा पर्याय असल्यानं त्यांना अधिक परतावा मिळवता येईल.

**<><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट घेतल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि राज्यात महायुती ही विचारांची युती असून महायुतीत कोणताही बेबनाव नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर केलेल्या आरोपांबाबत विचारलं असता, महायुतीत कुठेही मतभेद होता कामा नयेत, मिठाचा खडा पडता कामा नये, याची काळजी प्रत्येकानं घ्यावी, असा निरोप पक्षाकडून धंगेकरांना दिला असल्याचं शिंदे म्हणाले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२७ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूज-ऑन-एअर मोबाईल ॲप वर कार्यक्रम प्रसारित केला जाईल. तसंच एअर-न्यूज, डीडी न्यूज, पीएमओ आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

<><><><>

सातारा जिल्ह्यात फलटण उपजिल्हा रुग्णालयातल्या महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी पोलिसांनी एका निलंबित पोलीस कर्मचाऱ्याला ताब्यात घेतलं आहे. या प्रकरणातला दुसरा आरोपी असलेला पोलीस कर्मचारी फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. संबंधित महिला डॉक्टरचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्या प्रकरणी या दोन्ही आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><>

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्याकडे सोपविला आहे. विद्यापीठाच्या कुलगुरु ले. जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांचा कार्यकाळ संपल्यामुळे हे पद रिक्त झालं होतं .

<><><><>

पाकिस्ताननं भारताच्या भूभागात, विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये बेकायदेशीरपणे बळकावलेल्या प्रदेशात मानवी हक्काचं उल्लंघन थांबवावं असं आवाहन संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतानेनी हरीश यांनी केलं आहे. ते काल ८० व्या संयुक्त राष्ट्र दिनानिमित्त आयोजित खुल्या चर्चे दरम्यान, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला संबोधित करत होते.

जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून तिथले नागरिक भारताची लोकशाही परंपरा आणि संवैधानिक चौकटीनुसार आपले मूलभूत अधिकार बजावत आहेत. मात्र पाकिस्तान मानवी हक्क या संकल्पनेपासून अनभिज्ञ असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

लातूर, बीड, धाराशिव, अहिल्यानगर, सोलापूर या पाच जिल्ह्यातल्या माजी सैनिकांचा मेळावा अहिल्यानगर येथील एम आय आर सी या सैनिकी प्रशिक्षण संस्थेत नुकताच आयोजित केला होता. त्यावेळी वीरपिता, वीरमाता, वीरपत्नी यांचा सन्मान केला गेला. दक्षिण महाराष्ट्र व गोवा उपक्षेत्राचे जनरल ऑफिसर कमांडिंग विशाल अग्रवाल यांनी या मेळाव्याला संबोधीत केलं.

<><><><>

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि महाविद्यालयाची भूमीका' या विषयावर कुडाळच्या संत राऊळ महाराज महाविद्यालयात आयोजित दोन दिवसांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेला आज सुरवात झाली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग तसंच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यातर्फे प्रत्येक महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमांतर्गत होणाऱ्या या कार्यशाळेत राज्यभरातून सुमारे १५० प्राचार्य आणि जिल्हा समन्वयक उपस्थित आहेत.

<><><><>

बहरीनमधल्या मनामा इथल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत मध्ये भारतानं कबड्डीमध्ये सुवर्ण पदक मिळवलेल्या कबड्डी संघाचं क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अभिनंदन केलं आहे. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने देशाचं प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवल्याबद्दल त्यांनी तिचेही विशेष अभिनंदन केलं आहे.

<><><><>

भारतात पुढच्या महिन्यात तामिळनाडूत होणाऱ्या पुरुषांच्या हॉकी ज्युनिअर विश्व कप स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय पाकिस्तान हॉकी फेडरेशननं घेतला आहे. पाकिस्तानी सरकारनं भारतात प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पाकिस्तानच्या निर्णय येईपर्यंत आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशननंही या स्पर्धेचा ड्रॉ महिनाभर लांबवला होता. पाकिस्तानच्या ऐवजी कोणता संघ खेळणार याची घोषणा आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशन लवकरच करणार आहे.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात विजयासाठी भारताला २३७ धावांची गरज आहे. सिडनीमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. पण रेनशॉ वगळता त्यांच्या एकाही खेळाडूला अर्धशतकही करता आलं नाही. ४७ व्या षटकात त्यांचा पूर्ण संघ २३६ धावांवर बाद झाला. हर्षित राणा यानं ३९ धावांच्या मोबदल्यात त्यांचे ४ गडी टिपले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३० षटकात १ बाद १८३ धावा झाल्या होत्या. शुभमन गिल २४ धावांवर बाद झाला. पण रोहित शर्मा आणि विराट कोहलीनं अर्धशतक करुन विजयाकडे वाटचाल सुरू ठेवली आहे. तीन सामन्यांची ही मालिका ऑस्ट्रेलियानं २-० ने आधीच जिंकली आहे.

<><><><>

मुंबईचा AQI अर्थात हवेचा दर्जा दर्शवणारा निर्देशांक सुधारला आहे. दिवाळीनंतर हा निर्देशांक झपाट्याने खालावला होता. दोन दिवस काही ठिकाणी पडलेल्या तुरळक पावसाने धुरके खाली बसून निर्देशांकात सुधार व्हायला मदत झाली. बहुतांशी ठिकाणी हा निर्देशांक मध्यम श्रेणीत पोचला.

<><><><>

येत्या २-३ दिवसात राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आगामी २-३ दिवसात विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता इतर सर्वत्र हवामान विभागानं येलो अलर्ट जारी केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात काल रात्रीपासून पावसाचा जोर वाढल्यामुळे भातशेतीचं नुकसान झालं आहे. अरबी समुद्रात वादळी परिस्थती निर्माण झाल्यामुळे बंदरांमध्ये धोक्याचा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. मच्छिमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये असा इशारा प्रशासनं दिला आहे. मालवण जेटी ते सिंधुदुर्ग किल्ला होडीसेवा बंद ठेवण्यात आली आहे.

//<><><><>//